MHSO100001682025

## दि. चौ. अ. क्र.३/२०२५ मधील निशाणी क्र.११ खालील आदेश

गैरअर्जदाराने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द जो विना म्हणणेचा आदेश झाला आहे तो रद्द होऊन मिळण्यासाठी व त्याचा जबाब दाखल करुन घेण्यासाठी केलेला आहे. गैरअर्जदाराने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरचे अर्जाची नोटीस गैरअर्जदारास मिळाल्यानंतर त्याला कागदपत्र काढण्यासाठी वेळ लागला. त्यामुळे त्याला मुदतीत लेखी म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे त्याच्याविरूद्ध सदरचे प्रकरण विना जबाब चालविण्याबाबतचा आदेश न्यायालयाने केला आहे. गैरअर्जदाराने जाणीवपूर्वक जबाब दाखल करण्यास विलंब केलेला नाही. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास अर्जदाराने नि. क्र. १३ वर जबाब दिलेला असून त्यामध्ये तिने गैरअर्जदाराच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. तिने पुढे म्हटले आहे की गैरअर्जदाराने जबाब न दाखल करण्याचे संयुक्तीक कारण दिले नाही. त्याला न्यायालयाने जबाब देण्यासाठी वारंवार संधी दिल्या होत्या परंतु त्याने त्याचा जबाब दाखल केला नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्यास तिने हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. विना जबाब आदेश रद्द करणे आवश्यक आहे काय ? | ..... होय. |
| २. आदेश काय ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबत**

४. मी गैरअर्जदारातर्फे विद्वान वकील श्री. वाघमारे व अर्जदारातर्फे विद्वान वकील श्रीमती मोदगेकर यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबधीत दस्तऐवज पाहिले. गैरअर्जदारास दिनांक १५.०४.२०२५ रोजी नोटीसची बजावणी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर ३० दिवसाच्या आत म्हणजेच दिनांक १४.०५.२०२५ पावेतो गैरअर्जदाराने त्याचे लेखी म्हणणे दाखल केले नाही. त्यानंतर ता. ३०.०६.२०२५ रोजी न्यायालयाने त्याचे विरुध्द सदरचे प्रकरण विना म्हणणे चौकशी चालविण्याबाबतचा आदेश पारीत केला आहे. त्यानंतर दिनांक ३०.०७.२०२५ रोजी गैरअर्जदाराने सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्याचे म्हणणे दाखल केले आहे. सदरचे मुळ अर्जाचे कायमचे निराकरन करण्यासाठी व गैरअर्जदारास त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्याच्याविरूद्ध झालेला विना जबाब आदेश रद्द करुन त्याचे लेखी म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. गैरअर्जदारास जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर

आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे गैरअर्जदाराच्या विरूद्ध झालेला विना जबाब हा आदेश रद्द करणे व त्याचा जबाब दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु गैरअर्जदाराने त्याचे लेखी म्हणणे दाखल करण्यास ०१ महिना १५ दिवसांचा विलंब केलेला आहे. त्यामुळे त्याबाबत अर्जदारास त्रास झालेला आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदारास खर्चाची रक्कम देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.११ चा अर्ज गैरअर्जदाराने अर्जदारास खर्चाची रक्कम रुपये ७०० /– देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.16 12:59:14 +0530

दिनांक : १५/०९/२०२५

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**दि.चौ.अ. क्र. ३/२०२५ मधील**
**निशाणी क्र.११ खालील आदेश**

## शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.१५.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.१५.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.१५.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.१६.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.१६.०९.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.